# रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्सच्या वतीने आरक्यूबीई क्लिक सादर

**पुणे :** रहेजा क्यूबीई जनरल इन्शुरन्स (आरक्यूबीई) या कंपनीच्या वतीने वाहनांच्या विम्याचे दावे वेगाने निकाली काढण्यासाठी आरक्यूबीई क्लिक हे लाईव्ह स्ट्रीमिंग सोल्युशन सादर करण्यात आले आहे. या सादरीकरण्यामुळे भारतीय बाजारपेठेत वाहन विम्याच्या दाव्यांसाठी आयओएस वर लाईव्ह स्ट्रीमिंग ऍपची सुविधा देणारी रहेजा क्यूबीई ही मोजक्या काही कंपन्यांमधील एक ठरली आहे.

आरक्यूबीई क्लिक या ऍपमुळे विमा धारकांना आपल्या वाहनाच्या विम्याचा दावा वेगाने निकाली काढण्यास मदत होईल . या ऍपमुळे विम्याच्या दाव्यांचा पाठपुरावा करता येईल ज्यामुळे ही प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह ठरेल . ग्राहकांच्या सोईनुसार मोबाईल ऍप किंवा लिंक द्वारे सर्व्हे अपॉईंटमेंट्स देखील बूक करण्याची लवचिकता मिळते .